प्रकरण चौथे

धनगर स्त्रिया : कामाचा जीवनावर होणारा परिणाम

प्रकरण चौथे

धनगर स्त्रिया : कामाचा जीवनावर होणारा परिणाम

यापूर्वी तिसऱ्या प्रकरणात उत्तरदात्या स्त्रियांच्या सामाजिक आणि आर्थिक पार्श्वभूमीचे विवेचन केले आहे. प्रस्तुत प्रकरणामध्ये धनगर स्त्रियांच्या कामाचा त्यांच्या जीवनावर होणारा परिणाम स्पष्ट केला आहे. निवडलेल्या नमुन्यातील १00 उत्तरदात्याकडून मुलाखत अनुसूचीच्या सहाय्याने संकलित केलेल्या माहितीच्या आधारे उत्तरदात्या स्त्रियांच्या कामामूळे त्यांच्या जीवनावर कोणकोणते परिणाम होतात हे समजून घेण्याचा प्रयत्न करणार आहोत.

मुलाखत अनुसूचीच्या सहाय्याने व्यावसायिक समस्येचे स्वरूप, आरोग्यावर होणारे परिणाम, मुलांच्या शिक्षणाकडे दूर्लक्ष होते का? घरकामामध्ये वेळ देता येतो का? कौटुंबिक स्वास्थ्य लाभते का? उत्तरदात्या स्त्रिया गावामध्ये होणाऱ्या सणसमारंभात सहभागी होतात का? ग्रामपंचायत, पंचायत समिती निवडणूकीत उमेदवार म्हणून संधी? मिळणाऱ्या पैशातून बचत, कामातून कुटुंबाच्या आवश्यक गरजा भागतात का? प्राप्त झालेल्या आर्थिक मोबदल्याचा वापर स्वत:साठी करतात का? कुटुंबामध्ये आदर मिळतो का? कुटुंबामध्ये मत मांडण्याचे स्वातंत्र्य आहे का? आर्थिक स्वावलंबनामुळे समाजातील दर्जा सुधारला आहे का? होणाऱ्या आर्थिक प्राप्तीमुळे कुटुंबामध्ये बदल झालेत का? समाजात वावरताना धाडस निर्माण झालेले आहे असे वाटते का? इ. परिवर्त्याबाबत माहिती संकलित करण्यात आली. सदर माहितीचे वर्गीकरण आणि विश्लेषण करून उत्तरदात्या स्त्रियांच्या जीवनावर त्यांच्या व्यावसायिक भूमिकामुळे कोणकोणते परिणाम होतात याचे वर्णन खालील प्रमाणे दिले आहे.

४.१ व्यावसायिक समस्या :

उत्तरदात्या स्त्रियांना व्यावयायिक समस्या जाणवतात का? याविषयी माहिती संकलित केली. ही माहिती सारणी क्रमांक ४.१ मध्ये वर्गीकृत केली आहे.

BARR. BALASAHEB KHARDEKAR LIBRARY
SHIVAJI UNIVERSITY, KOLHAPUR.

सारणी क्रमांक ४.१

उत्तरदात्या स्त्रियांना व्यावसायिक समस्या जाणवतात का? याचे वर्गीकरण

अ.न.	व्यावसायिक समस्या जाणवतात का ?	वारंवारिता	टक्केवारी
१	होय	७४	७४ %
२	नाही	२६	२६ %
	एकूण	१00	१00 %

वरील सारणीवरून स्पष्ट होते की व्यावसायिक समस्या जाणवणाऱ्या उत्तरदात्या स्त्रियांचे प्रमाण ७४% इतके आहे. तर व्यावसायिक समस्या जाणवत नाहीत अशा उत्तरदात्या स्त्रियांचे प्रमाण २६% इतके आहे.

म्हणजेच तुलनेने बहुतांशी उत्तरदात्या स्त्रियांना व्यावसायिक समस्या जाणवतात. असा वरील सारणीवरून निष्कर्ष काढता येईल.

४.२ समस्येचे स्वरूप :

मुलाखतीदरम्यान उत्तरदात्या स्त्रियांशी संवाद साधताना कोणत्या व्यावसायिक समस्या जाणवतात? असा प्रश्न विचारला असता असे निर्दशनास आले की लोकर दुरून आणावी लागते, लोकर पिंजण्याचे मशीन नाही, घोंगड्यांना दर जास्त येत नाही, जागेची अडचण या वेगवेगळ्या प्रकारच्या समस्या असणाऱ्या उत्तरदात्या स्त्रियांचे प्रमाण ७४% इतके आहे. तर व्यावसायिक समस्या नाहीत अशा उत्तरदात्या स्त्रियांचे प्रमाण २६% इतके आहे.

मुलाखती दरम्यान असे आढळून आले की ज्या उत्तरदात्या स्त्रियांच्या कौटुंबिक मालकीच्या २६ ते ५0 इतक्या मेंढ्या आहेत. त्या मेंढ्याची लोकर २५ ते २६ किलो इतकी मिळते. ज्या उत्तरदात्या स्त्रियांच्या कौटुंबिक मालकीची ५१ ते ७५ इतकी मेंढ्यांची संख्या आहे. त्या मेंढ्यांची लोकर ३५ ते ३६ किलो इतकी मिळते. ती संपल्यानंतर आपला व्यवसाय पुढे चालू ठेवण्यासाठी उत्तरदात्या स्त्रियांना लोकर लांबून आणावी लागते. ज्या भागामध्ये लोकर व्यवसाय करत नाहीत अशा ठिकाणाहून ही लोकर आणावी लागते. सामान्यपणे

आदमापूर आणि कर्नाटक भागातून लोकर आणावी लागते.

उत्तरदात्या स्त्रियांना लोकर निवडल्यानंतर ती पिंजावी लागते. संशोधन अभ्यासामध्ये असे दिसून आले की उत्तरदात्या स्त्रियांच्याकडे लोकर पिंजण्याचे मशीन नाही नियमित १ किलो लोकर पिंजण्योपाठीमागे उत्तरदात्या स्त्रियांना ५रू द्यावे लागतात.

बहुतांशी उत्तरदात्या स्त्रियांचे असे मत आहे की एक घोंगडे बनण्यासाठी जेवढा वेळ आणि पैसे खर्च होतात त्या तुलनेत घोंगड्याना दर जास्त येत नाही. मुलाखतीदरम्यान उत्तरदात्यांशी संवाद साधताना या कामासाठी जागेची अडचण होते असे त्यांनी सांगितले.

ज्या उत्तरदात्या स्त्रियांना व्यावसायिक समस्या जाणवत नाहीत अशा उत्तरदात्या स्त्रियांच्या मुलाखती घेताना असे निदर्शनास आले की ज्या उत्तरदात्या स्त्रियांच्या कौटुंबिक मालकीची लोकर आहे, कौटुंबिक आर्थिक ओढाताण तूलनेने कमी आहे अशा उत्तरदात्या स्त्रियांना व्यावसायिक समस्या जाणवत नाहीत.

वरील माहितीवरून असा निष्कर्ष काढता येईल की बहुतांशी उत्तरदात्या स्त्रियांना व्यावसायिक समस्या या जाणवतात तर अगदी अत्यल्प उत्तरदात्या स्त्रियांना व्यावसायिक समस्या जाणवत नाहीत.

४.३ आरोग्यावर परिणाम :

या व्यवसायामुळे उत्तरदात्या स्त्रियांच्या आरोग्यावर काही परिणाम होतो का ? याविषयी माहिती संकलित करीत असताना उत्तरदात्या स्त्रियांशी संवाद साधताना असे आढळून आले की या व्यवसायामुळे सर्व उत्तरदात्या स्त्रियांच्या आरोग्यावर परिणाम होतो.

४.४ आरोग्यावर होणारे परिणाम :

सारणीक्रमांक ४.४ मध्ये उत्तरदात्या स्त्रियांच्या आरोग्यावर कोणकोणते परिणाम होतात याचे वर्गीकरण केले आहे.

सारणी क्र. ४.४

आरोग्यावर परिणाम

अ.न.	आरोग्यावरील परिणाम	वारंवारिता	टक्केवारी
१	हात दुखी	२७	२७ %
२	पाठीचा त्रास	३८	३८ %
३	मानेचा त्रास	९	९ %
४	डोळ्याचा त्रास	१0	१0 %
५	वरील सर्व	१६	१६ %
	एकूण	**१00**	**१00 %**

वरील सारणीवरून स्पष्ट होते की पाठीचा त्रास असणाऱ्या उत्तरदात्या स्त्रियांचे प्रमाण सर्वाधिक म्हणजे ३८ % इतके आहे. त्यानंतर अनुक्रमे हातदुखीचा त्रास असणाऱ्या उत्तरदात्या स्त्रियांचे प्रमाण २७ %, वरील सर्व यामधील १६ %, डोळ्यांचा त्रास असणाऱ्या उत्तरदात्या स्त्रियांचे प्रमाण १0 % तर मानेचा त्रास असणाऱ्या उत्तरदात्या स्त्रियांचे प्रमाण ९ % इतके आहे.

उत्तरदात्या स्त्रियांच्या मुलाखतीदरम्यान असे आढळून आले की या व्यवसायामध्ये सर्व उत्तरदात्या स्त्रियांच्या आरोग्यावर काही ना काही परिणाम झालेला आहे.

तरूण, प्रौढ, वृद्ध सर्वच वयोगटातील उत्तरदात्या स्त्रियांच्या आरोग्यावर या व्यवसायामुळे वेगवेगळ्या प्रकारचा परिणाम होतो असा वरील सारणीवरून निष्कर्ष काढता येईल.

४.५ मुलांच्या शिक्षणाकडे दूर्लक्ष होते का?

सारणी क्रमांक ४.५मध्ये उत्तरदात्या स्त्रियांचे मुलांच्या शिक्षणाकडे दूर्लक्ष होते का ? याचे वर्गीकरण केले आहे.

सारणी क्र. ३.१.५

मुलांच्या शिक्षणाकडे दूर्लक्ष होते का?

अ.न.	मुलांच्या शिक्षणाकडे दूर्लक्ष	वारंवारिता	टक्केवारी
१	होय	९८	९८ %
२	नाही	२	२ %
	एकूण	१00	१00 %

वरील सारणीवरून स्पष्ट होते की मुलांच्या शिक्षणाकडे दूर्लक्ष होण्याचे उत्तरदात्या स्त्रियांचे प्रमाण बहुतांश आहे. तर मुलांच्या शिक्षणाकडे दूर्लक्ष होत नाही अशा उत्तरदात्या स्त्रियांचे प्रमाण २ % इतके आहे.

मुलाखती दरम्यान उत्तरदात्या स्त्रियांशी संवाद साधताना असे दिसून आले की त्यांच्या दिवसाच्या कामाची आखणी ज्या पद्धतीने होते त्यामध्ये मुख्यत: त्यांची व्यावसायिक कामाची वेळ, कौटुंबिक जबाबदाऱ्या यातून त्यांना वेळ मिळत नाही. त्यामुळे उत्तरदात्या स्त्रियांचे त्यांच्या मुलांच्या शिक्षणाकडे दूर्लक्ष होते.

शेळ्यामेंढ्यापालन हा पुरूषाचा मुख्य व्यवसाय तर स्त्रियांचा लोकर कातणे हा व्यवसाय असल्यामुळे मूळत:च किंवा परंपरेनुसार त्यांच्यामध्ये शिक्षणाचे प्रमाण अत्यल्प आहे. त्यामुळे अशिक्षित उत्तरदात्या स्त्रियांचे त्यांच्या मुलांच्या शिक्षणाकडे दूर्लक्ष होते.

फक्त २% उत्तरदात्या स्त्रिया या आपल्या मुलांच्या शिक्षणाकडे लक्ष देतात. सर्व उत्तरदात्या स्त्रियामध्ये एक उत्तरदाती स्त्री १२ वी शिक्षण घेतलेली दिसून आली. फक्त दोन उत्तरदात्या स्त्रिया आपल्या मुलांच्या शिक्षणाबाबत जागरूक आहेत असे मुलाखतीदरम्यान आढळून आले.

वरील सारणीवरून असा निष्कर्ष काढता येईल की बहुतांशी उत्तरदात्या स्त्रियांच्या व्यावसायिक व कौटुंबिक जीवनामुळे त्यांच्या मुलांच्या शिक्षणाकडे दूर्लक्ष होते.

४.६ कुटुंबाचा प्रकार आणि घरकामात वेळ देता येतो का?

सारणी क्र.४.६ मध्ये उत्तरदात्या स्त्रियांच्या कुटुंबाचा प्रकार कोणता आहे आणि उत्तरदात्या स्त्रियांना घरकामात वेळ देता येतो का? याचे वर्गीकरण केले.

सारणी क्र.४.६

कुटुंबाचा प्रकार आणि घरकामात वेळ

अ.न.	कुटुंबाचा प्रकार	घरकामामध्ये वेळ देता येतो का?		एकूण
		होय	नाही	
१	संयुक्त कुटुंब	३७ (६६.०७)	१९ (३३.९३)	५६
२	विभक्त कुटुंब	२१ (४७.७३)	२३(५२.२७)	४४
	एकूण	५८	४२	१00

वरील सारणीवरून स्पष्ट होते की ५६ उत्तरदात्या स्त्रिया संयुक्त कुटुंबपद्धतीतील आहेत तर ४४ उत्तरदात्या स्त्रिया विभक्त कुटुंबपद्धतीतील आहेत. संयुक्त कुटुंबपद्धतीतील बहुतांशी उत्तरदात्या स्त्रियांना घरकामात वेळ देता येतो. तर यांच्या तुलनेत विभक्त कुटुंबपद्धतीतील उत्तरदात्या स्त्रियांना घरकामात पुरेसा वेळ देता येत नाही.

उत्तरदात्या स्त्रियांना घरकामामध्ये वेळ देता येता का? हा प्रश्न मुलाखतीदरम्यान विचारण्यात आला तेव्हा प्रामुख्याने असे दिसून आले की ज्या उत्तरदात्या स्त्रियांच्या कुटुंबामध्ये इतर सदस्य स्त्रिया, मुलांचे संगोपन, इतर कौटुंबिक जबाबदारी यामध्ये हातभार लावतात. त्यामुळे उत्तरदात्या स्त्रियांना घरकामामध्ये पुरेसा वेळ देता येतो. मुख्यत: ज्या उत्तरदात्या स्त्रिया विभक्त कुटुंबपद्धतीतील आहेत अशा उत्तरदात्या स्त्रियांना घरकामामध्ये पुरेसा वेळ देता येत नाही. सर्व कामे आटपून त्यांना त्यांच्या व्यावसायिक कामाकडे पहावे लागते.

संयुक्त कुटुंबपद्धतीतील बहुतांशी उत्तरदात्या स्त्रियांना घरकामामध्ये वेळ देता येतो, पण विभक्त कुटुंब पद्धतीतील अधिकाधिक उत्तरदात्या स्त्रियांची घरकामामध्ये ओढाताण होते. असा वरील सारणीवरून निष्कर्ष काढता येईल.

४.७ कौटुंबिक स्वास्थ्य लाभते का?

कौटुंबिक स्वास्थ्य लाभते का? असा प्रश्न उत्तरदात्या स्त्रियांना विचारला असता मिळालेल्या माहितीवरून असे दिसून आले की ५२% उत्तरदात्या स्त्रियांना कौटुंबिक स्वास्थ्य लाभत नाही तर ४८% उत्तरदात्या स्त्रियांना कौटुंबिक स्वास्थ्य लाभते.

कौटुंबिक स्वास्थ्य का लाभत नाही याविषयी मुलाखतीदरम्यान उत्तरदात्याशी संवाद साधताना असे दिसून आले की उत्तरदात्या स्त्रियांचे जीवन हे कामाने व्यापलेले आहे. त्यांचा पूर्ण वेळ कामात जातो. कौटुंबिक जबाबदाऱ्या सांभाळत व्यावसायिक भूमिका पार पाडाव्या लागतात. यामध्ये त्यांना तडजोड करावी लागते तर कौटुंबिक ओढाताण किंवा इतर कामाची ओढाताण तुलनेने कमी असून व्यावसायिक गती तुलनेने बरी आहे. अशा उत्तरदात्या स्त्रियांना कौटुंबिक स्वास्थ्य लाभते असे निदर्शनास आले.

उत्तरदात्या स्त्रियांच्या व्यावसायिक जीवनाचा त्यांच्या कौटुंबिक स्वास्थ्यावर परिणाम होतो असा वरील माहितीवरून निष्कर्ष काढता येईल.

४.८ गावामध्ये होणाऱ्या सणसमारंभात सहभागी होतात का?

मुलाखतीदरम्यान उत्तरदात्या स्त्रियांशी संवाद साधताना गावामध्ये होणाऱ्या सणसमारंभात सहभागी होता का ? असा प्रश्न विचारला असता मिळालेल्या माहितीवरून असे निदर्शनास आले की गावामध्ये होणाऱ्या सणसमारंभात सहभागी होणाऱ्या उत्तरदात्या स्त्रियांचे प्रमाण २% इतके आहे तर सणसमारंभात सहभागी न होणाऱ्या उत्तरदात्या स्त्रियांचे प्रमाण ९८% इतके आहे.

अजूनही उत्तरदात्या स्त्रियांवर पारंपरिक रीतीरिवाज, जुन्या रूढी-परंपरा किंवा जुन्या विचारसरणीचा प्रभाव पडलेला आहे. व्यावसायिक भूमिका आणि त्यांचे नित्य जीवन यामध्ये त्या गुरफटलेल्या आहेत. व्यावसायिक भूमिका पार पाडत असल्या तरीही त्यांच्या मनोवृत्तीत फारसा बदल झालेला नाही. पारंपारिक जीवन आणि चौकटबद्ध विचारसरणी

यामुळे त्यांच्यामध्ये धाडस निर्माण झालेले नाही. त्यामुळे गावामध्ये होणाऱ्या कोणत्याही सणसमारंभामध्ये किंवा कार्यक्रमामध्ये त्यांची उपस्थिती नसते.

फक्त दोन उत्तरदात्या स्त्रियांना समाजात वावरताना धाडस निर्माण झालेले आहे असे वाटते. यांच्याशी संवाद साधल्यानंतर असे दिसून आले की या उत्तरदात्या स्त्रियांच्या विचारसरणीमध्ये बदल झालेला आहे ही उल्लेखनीय बाब आहे.

वरील माहितीवरून असा निष्कर्ष काढता येईल की बहुतांशी उत्तरदात्या स्त्रिया गावामध्ये होणाऱ्या सणसमारंभात सहभागी होत नाहीत.

४.९ ग्रामपंचायत, पंचायत समिती निवडणूकीत उमेदवार म्हणून सहभाग

ग्रामपंचायत, पंचायत समिती निवडणूकीत उमेदवार म्हणून कधी लढला आहात का? असा प्रश्न उत्तरदात्या स्त्रियांना मुलाखतीदरम्यान विचारण्यात आला तेव्हा असे दिसून आले की अजूनपर्यंत एकही उत्तरदाती स्त्री कोणत्याही निवडणूकीत उमेदवार म्हणून उभी राहिलेली नाही. म्हणजेच सर्वच उत्तरदात्या स्त्रिया कधीही ग्रामपंचायत किंवा पंचायत समिती निवडणूकीत उमेदवार म्हणून सहभागी झालेल्या नाहीत.

ग्रामपंचायत निवडणूकीत मराठा, वाणी, सुतार, मांग, परीट, महार, कुंभार या जातीमधील स्त्रिया निवडून गेलेल्या आहेत. परंतु धनगर स्त्रिया निवडून गेलेल्या नाहीत.

प्रामुख्याने असे निदर्शनास आले की गावातील पुरूष नेते किंवा पुढारी जे आहेत, त्यामध्ये धनगर समाजातील पुरूषामध्ये श्री. वसंत दौलू जोंग ही व्यक्ती गावातील पुरूष नेतेमंडळीमध्ये असते. म्हणजेच धनगर समाजातील पुरूषाचा राजकीय क्षेत्रात फारसा सहभाग नाही.

४.१० मिळणाऱ्या पैशातून बचत आणि वापर स्वत: साठी करतात का?

सारणी क्रमांक ४.१० मध्ये उत्तरदात्या स्त्रिया मिळणाऱ्या पैशातून बचत करतात का? आणि स्वत:साठी, मिळणाऱ्या पैशाचा वापर करतात का ? याचे वर्गीकरण केले आहे.

सारणी क्रमांक ४.१०

मिळणाऱ्या पैशातून बचत आणि वापर

अ.न.	मिळणाऱ्या पैशातून बचत करतात का?	मिळवलेल्या पैशाचा वापर स्वत:साठी करतात का?		एकूण
		होय	नाही	
१	होय	२३ (६७.६५)	११ (३२.३५)	३४
२	नाही	१२ (१८.१८)	५४(८१.८२)	६६
	एकूण	३५	६५	१००

वरील सारणीवरून स्पष्ट होते की बहुतांशी उत्तरदात्या स्त्रिया मिळणाऱ्या पैशातून बचत करत नाही, तर १/३ उत्तरदात्या स्त्रिया बचत करतात.

बहुतांशी उत्तरदात्या स्त्रिया मिळवलेल्या पैशाचा स्वत:साठी वापर करत नाहीत तर काही उत्तरदात्या स्त्रिया करतात.

उत्तरदात्याशी संवाद साधताना असे निर्दशनास आले की व्यावसायिक कामातून उत्तरदात्या स्त्रियांची जी मिळकत होते त्या मिळकतीतून काही पैसे बचत म्हणून ठेवतात. त्या पैशाचा विनियोग स्वत:साठी कपडेलत्ते किंवा एखादा दागिना घेणे यासाठी करतात.

इतर उत्तरदात्या स्त्रिया व्यावसायिक कामातून मिळणाऱ्या पैशाचा वापर घरखर्च किंवा घरामध्ये लागणाऱ्या गरजेच्या वस्तूसाठी खर्च करतात. या उत्तरदात्यांशी संवाद साधला तेव्हा त्यांनी असे सांगितले की कौटुंबिक ओढाताणीमुळे गुंतवणूक करण्याइतपत पैसे शिल्लक रहात नाहीत.

बचत करणाऱ्या उत्तरदात्यामधील ज्या उत्तरदात्या स्त्रिया पैशाची बचत करतात, त्या स्त्रिया पैशाचा वापर स्वत:साठी करतात तर बहुतांशी ज्या उत्तरदात्या स्त्रिया पैशाची बचत करत नाहीत नाहीत त्या स्त्रिया मिळवलेल्या पैशाचा वापर स्वत:साठी करत नाहीत असा वरील सारणीवरून निष्कर्ष काढता येतो.

BARR. BALASAHEB KHARDEKAR LIBRARY
SHIVAJI UNIVERSITY, KOLHAPUR.

४.११ बचत करण्याचे ठिकाण :

३४ उत्तरदात्या स्त्रिया या बचत करतात. या उत्तरदात्या स्त्रियांचे बचत करण्याचे ठिकाण कोणते याविषयी माहिती संकलित केल्यानंतर असे आढळून आले की ३१ उत्तरदात्या स्त्रिया या बचतगटात पैसे ठेवतात, २ उत्तरदात्या स्त्रिया बँकेत तर १ उत्तरदाती स्त्री पतसंस्थेत बचत करते.

उत्तरदात्या स्त्रियांच्या मुलाखतीदरम्यान असे दिसून आले की अधिकतर उत्तरदात्या स्त्रिया व्यावसायिक कामातून मिळणारे पैसे बचत म्हणून बचतगटामध्ये ठेवतात. अनुराग स्वंयसहायता बचतगट, अवधूत स्वंयसहायता बचत गट, मिथिला स्वंयसहायता बचत करतात. त्या तुलनेत बँक आणि पतसंस्थेमध्ये बचत करण्याचे प्रमाण अत्यल्प आहे असे वरील माहितीवरून म्हणता येईल.

४.१२ महिला मंडळामध्ये सहभाग :

गावामध्ये 'लक्ष्मी महिला मंडळ' नावाचे एकच महिला मंडळ आहे. या महिला मंडळामध्ये सहभागी आहात का ? किंवा महिला मंडळामध्ये होणाऱ्या कार्यक्रमात आपली उपस्थिती असते का ? असा प्रश्न उत्तरदात्या स्त्रियांना विचारला असता असे निर्दशनास आले की एकही उत्तरदाती स्त्री महिला मंडळामध्ये सहभागी नाही. तसेच महिला मंडळातील कोणत्याही कार्यक्रमास एकही उत्तरदाती स्त्री उपस्थित नसते.

या महिला मंडळामध्ये एकूण १४ महिला आहेत यामध्ये मराठा, ब्राम्हण, लिंगायत आणि शिंपी या जातीच्या स्त्रिया आहेत.

उत्तरदात्या स्त्रिया त्यांच्या व्यावसायिक भूमिका आणि त्यांचे नित्य जीवन एवढेच मर्यादित जीवन असून इतर गोष्टीपासून त्या अलिप्त आहेत असे म्हणता येईल.

४.१३ व्यवसायातून कुटुंबाच्या आवश्यक गरजा भागतात का?

उत्तरदात्या स्त्रियांच्या या व्यवसायातून कुटुंबाच्या आवश्यक गरजा भागतात का? याविषयी माहिती संकलित केली. ही माहिती सारणी क्रमांक ४.१३ मध्ये वर्गीकृत केली आहे.

सारणी क्रमांक ४.१३

व्यवसायातून कुटुंबाच्या आवश्यक गरजा भागतात का?

अ.न.	कुटुंबाच्या आवश्यक गरजा भागतात का?	वारंवारिता	टक्केवारी
१	बऱ्या प्रमाणात	२७	२७ %
२	काही प्रमाणात	६७	६७ %
३	नाही	६	६ %
	एकूण	**१00**	**१00 %**

वरील सारणीवरून स्पष्ट होते की बऱ्या प्रमाणात कुटुंबाच्या आवश्यक गरजा भागतात अशा उत्तरदात्या स्त्रियांचे प्रमाण २७% इतके, काही प्रमाणात कुटुंबाच्या आवश्यक गरजा भागतात अशा उत्तरदात्या स्त्रियांचे प्रमाण ६७%, तर आवश्यक गरजा भागत नाहीत अशा उत्तरदात्या स्त्रियांचे प्रमाण ६% इतके आहे.

मुलाखतीदरम्यान उत्तरदात्या स्त्रियांशी संवाद साधताना असे दिसून आले की बहुतांशी उत्तरदात्या स्त्रियांच्या या व्यवसायातून जी मिळकत होते किंवा जो आर्थिक मोबदला मिळतो त्यातून काही प्रमाणात कुटुंबाच्या आवश्यक गरजा भागतात. बऱ्या प्रमाणात कुटुंबाच्या आवश्यक गरजा भागतात अशा उत्तरदात्या स्त्रियांचे प्रमाण तुलनेने कमी आहे. कौटुंबिक आर्थिक ओढाताणीमुळे इतर उत्तरदात्या स्त्रियांच्या आवश्यक गरजा भागत नाहीत.

वरील सारणीवरून असा निष्कर्ष काढता येईल की बहुतांशी उत्तरदात्या स्त्रियांच्या या व्यवसायामुळे काही प्रमाणात कुटुंबाच्या आवश्यक गरजा भागतात.

४.१४ कुटुंबामध्ये आदर मिळतो का?

कुटुंबामध्ये आदर मिळतो का? असा प्रश्न उत्तरदात्या स्त्रियांना विचारला असता मिळालेल्या माहितीवरून असे दिसून आले की सर्व उत्तरदात्या स्त्रियांच्या कुटुंबामध्ये उत्तरदात्या स्त्रियांना आदर मिळतो.

उत्तरदात्या स्त्रियांच्या पतीचा प्रमुख व्यवसाय शेळ्यामेंढ्यापालन असल्याने आपल्या व्यावसायिक जीवनाबरोबर कौटुंबिक जबाबदारी स्त्रिया पार पाडत असतात. साहजिकच उत्तरदात्या स्त्रियांना आपल्या कुटुंबातून आदर मिळतो.

उत्तरदात्या स्त्रियांना आपल्या कुटुंबामध्ये आदर मिळतो ही उल्लेखनीय बाब आहे.

४.१५ कुटुंबामध्ये मत मांडण्याचे स्वातंत्र्य ?

सारणी क्रमांक ४.१.१५ मध्ये उत्तरदात्या स्त्रियांना कुटुंबामध्ये मत मांडण्याचे स्वातंत्र्य आहे का? याचे वर्गीकरण केले आहे.

सारणी क्रमांक ४.१५

कुटुंबामध्ये मत मांडण्याचे स्वातंत्र्य आहे का?

अ.न.	कुटुंबामध्ये मत मांडण्याचे स्वातंत्र्य आहे का ?	वारंवारिता	टक्केवारी
१	कधीच नसते	१३	१३ %
२	कधी कधी	५०	५० %
३	नेहमी	३७	३७ %
	एकूण	१००	१०० %

वरील सारणीवरून स्पष्ट होते की कुटुंबामध्ये कधी कधी मत मांडण्याचे स्वातंत्र्य जवळजवळ निम्म्या उत्तरदात्या स्त्रियांना आहे. त्यानंतर अनुक्रमे कुटुंबामध्ये नेहमी मत मांडण्याचे स्वातंत्र्य असणाऱ्या उत्तरदात्या स्त्रियांचे प्रमाण ३७% इतके तर कुटुंबामध्ये मत मांडण्याचे स्वातंत्र्य नाही अशा उत्तरदात्या स्त्रियांचे प्रमाण १३% इतके आहे.

मुलाखतीदरम्यान उत्तरदात्याशी संवाद साधताना असे दिसून आले की उत्तरदात्या स्त्रियांच्या कुटुंबामध्ये एखादा महत्वाचा निर्णय घ्यायचा असेल किंवा इतर काही बाबतीत चर्चा विनिमय होत असेल तर बहुतांशी उत्तरदात्या स्त्रियांना कधी कधी मत मांडण्याचे स्वातंत्र्य आहे. तर कुटुंबामध्ये आपले वैयक्तिक मत मांडण्याचे स्वातंत्र्य असणाऱ्या उत्तरदात्या स्त्रियांचे प्रमाण तुलनेने कमी आहे. आणि काही उत्तरदात्या स्त्रियांना आपले मत मांडण्याचे स्वातंत्र्य नाही.

वरील सारणीवरून असा निष्कर्ष काढता येईल की कुटुंबातील कोणत्याही निर्णय प्रक्रियेतील बहुतांशी उत्तरदात्या स्त्रियांना कधी कधी आपले वैयक्तिक मत मांडण्याचे स्वातंत्र्य आहे.

४.१६ स्वत:मध्ये काही बदल झाले आहेत का?

पतीच्या पारंपरिक व्यवसायामुळे उत्तरदात्या स्त्रियांच्यात आपल्या कुटुंबासाठी धीट व दणकटपणा हळूहळू निर्माण होत गेलेला आहे. त्यांच्या या व्यावसायिक कामामुळे स्वत:मध्ये काही बदल झाले आहेत का ? असा प्रश्न मुलाखती दरम्यान उत्तरदात्या स्त्रियांना विचारला असता असे दिसून आले की बहुतांशी उत्तरदात्या स्त्रियांना कुटुंबाला हातभार लावण्याचा आत्मविश्वास आपल्यामध्ये निर्माण झाला आहे असे वाटते.

४.१७ आर्थिक स्वावलंबनामुळे समाजातील दर्जा सुधारला आहे का?

मुलाखतीदरम्यान उत्तरदात्या स्त्रियांशी संवाद साधाताना आर्थिक स्वावलंबनामुळे समाजातील दर्जा सुधारलेला आहे असे वाटते का ? असा प्रश्न विचारला असता असे निर्दशनास आले की सर्व उत्तरदात्या स्त्रियांना समाजातील दर्जा सुधारला आहे असे वाटत नाही. व्यवसायामुळे उत्तरदात्या स्त्रियांच्या वैयक्तीक जीवनात बदल झालेले आहेत, पण समाजातील दर्जा सुधारलेला नाही असे दिसून आले.

४.१८ समाजातील दर्जा न सुधारण्याची कारणे :

सारणीक्रमांक ४.१८ मध्ये उत्तरदात्या स्त्रियांचा समाजातील दर्जा का सुधारलेला नाही याचे वर्गीकरण केले आहे.

सारणी क्रमांक ४.१८

समाजातील दर्जा

अ.न.	समाजातील दर्जा का सुधारला नाही	वारंवारिता	टक्केवारी
१	पारंपरिक व्यवसाय	३७	३७ %
२	उत्पन्न जास्त मिळत नाही	१७	१७ %
३	शैक्षणिकदृष्ट्या मागास	२१	२१ %
४	जुन्या रूढी-परंपराचा प्रभाव	२२	२२ %
५	वरील	३	३ %
	एकूण	**१00**	**१00 %**

वरील सारणीवरून स्पष्ट होते की पारंपरिक व्यवसायामुळे समाजातील दर्जा सुधारलेला नाही अशा उत्तरदात्या स्त्रियांचे प्रमाण ३७% इतके आहे त्यानंतर अनुक्रमे जुन्या रूढी परंपराच्या प्रभावामुळे २२%, शैक्षणिकदृष्ट्या मागास असल्यामुळे २१%, उत्पन्न जास्त मिळत नसल्यामुळे १७% इतके उत्तरदात्या स्त्रियांचे प्रमाण आहे. वरील सर्व कारणामुळे समाजातील दर्जा सुधारला नाही अशा उत्तरदात्याचे प्रमाण ३% इतके आहे.

मुलाखतीदरम्यान असे आढळून आले की इतर व्यवसायाच्या तुलनेत हा पारंपरिक व्यवसाय असल्यामुळे समाजातील दर्जा सुधारलेला नाही असे बहुतांशी उत्तरदात्या स्त्रियांना वाटते. एकूणच जीवनातील सर्व बाबीमध्ये जुन्या-रूढी परंपराचा प्रभाव पडल्यामुळे किंवा जुन्या-रूढी परंपरामध्ये गुरफटल्यामुळे समाजातील दर्जा सुधारलेला नाही असे काही उत्तरदात्या स्त्रियांचे मत आहे.

एकंदरीत असे दिसून आले की त्यांच्या जीवनावर धर्माचा पगडा इतका आहे की त्यांच्या दिवसाची सुरवात देवाच्या नावाने आणि दिवसाचा शेवट देवाच्याच नावाने होतो त्याच्या मनामध्ये अशी विचारसरणी भिनलेली आहे की पिढ्यानपिढ्या तीच विचारसरणी हस्तांतरीत

होत असते. तिच्यामध्ये बदल होत नाही. जून्या रूढी-परंपरा विचारसरणी यांना चिकटून राहण्याची वृत्ती आजतागायत त्यांनी जोपासली आहे.

अशिक्षित असल्यामुळे किंवा शैक्षणिकदृष्ट्या पूर्णपणे मागास असल्यामुळे त्याचा परिणाम अनेक बाबतीत होत असल्यामुळे तसेच व्यवसायात उत्पन्न जास्त मिळत नसल्यामुळे समाजातील दर्जा सुधारला नाही असे उत्तरदात्यांनी दिलेल्या माहितीवरून दिसून आले.

व्यवसायाशी निगडीत सर्व बाबीमुळे उत्तरदात्या स्त्रियांचा समाजातील दर्जा सुधारलेला नाही असा वरील सारणीमुळे निष्कर्ष काढता येईल.

४.१९ कुटुंबामध्ये बदल झालेत का?

सारणी क्रमांक ४.१९ मध्ये उत्तरदात्या स्त्रियांच्या कुटुंबामध्ये व्यवसायामुळे काही बदल झाले आहेत की नाही याचे वर्गीकरण केले आहे.

सारणी क्रमांक ४.१९

कुटुंबामध्ये बदल

अ.न.	कुटुंबामध्ये बदल झालेत का?	वारंवारिता	टक्केवारी
१	होय	९४	९४ %
२	नाही	६	६ %
	एकूण	**१00**	**१00 %**

वरील सारणीवरून स्पष्ट होते की बहुतांशी उत्तरदात्या स्त्रियांच्या त्यांच्या होणाऱ्या मिळकतीमुळे बदल झालेला आहे तर होणाऱ्या मिळकतीमुळे कुटुंबामध्ये बदल झालेला नाही अशा काही उत्तरदात्या स्त्रिया आहेत.

बहुतांशी उत्तरदात्या स्त्रियांच्या कुटुंबामध्ये त्यांना होणाऱ्या आर्थिक प्राप्तीमुळे बदल झालेला आहे असा वरील सारणीवरून निष्कर्ष काढता येईल.

४.२० कुटुंबामध्ये कोणत्या प्रकारे बदल झाले आहेत?

उत्तरदात्या स्त्रियांच्या मिळकतीमुळे कुटुंबात कोणत्या प्रकारचे बदल झालेले आहेत. याविषयी माहिती संकलित करीत असताना असे दिसून आले की उत्तरदात्या स्त्रियांच्या कुटुंबामध्ये जे बदल झालेले आहेत, त्यामध्ये घरखर्च चालवण्याचा प्रयत्न करणाऱ्या उत्तरदात्या स्त्रियांचे प्रमाण ६७% इतके आहे. त्यानंतर अनुक्रमे कुटुंबातील इतर महत्त्वाच्या बाबींची पूर्तता करणाऱ्या उत्तरदात्या स्त्रियांचे प्रमाण १३%, मुलांचे शिक्षण पाहण्यासाठीच्या उत्तरदात्या स्त्रियांचे प्रमाण ९% तर करमणूकीची साधने घेऊ पाहणाऱ्या उत्तरदात्या स्त्रियांचे प्रमाण ५% इतके आहे.

मुलाखतीदरम्यान उत्तरदात्याशी संवाद साधताना असे निर्दशनास आले की बहुतांशी उत्तरदात्या स्त्रियांच्या कुटुंबातील बदल म्हणजे त्या घरखर्च चालवण्याचा प्रयत्न करू शकतात. कुटुंबातील इतर बाबीमध्ये मुलांचे कपडे लत्ते, औषधे, आवश्यक वस्तू उत्तरदात्या स्त्रिया घेऊ शकतात. मुल शिकताना आपल्या मिळकतीमधील पैसे खर्च करणाऱ्या उत्तरदात्या स्त्रियांच्या कुटुंबातील हा बदल उल्लेखनीय आहे. करमणूकीच साधन घेण्याच्या बदलांचे प्रमाण अगदी अत्यल्प आहे.

उत्तरदात्या स्त्रियांच्या आर्थिक मिळकतीमुळे त्यांच्या कुटुंबात जे बदल झालेले आहेत त्यांच्यामध्ये बहुतांशी उत्तरदात्या स्त्रिया घर चालवण्याचा प्रयत्न करतात असा वरील माहितीवरून निष्कर्ष काढता येईल.

एकंदरीत वरील विश्लेषणावरून असे म्हणता येईल की व्यावसायिक भूमिकामुळे उत्तरदात्या स्त्रियांच्या जीवनावर विविध अंगानी परिणाम झालेला आहे.

अभ्यासासाठी निवडलेल्या उत्तरदात्या स्त्रियांची व्यावसायिक भूमिका आणि त्यांचे जीवन समजून घेता यावे यासाठी ज्या परिवर्त्याबाबत मुलाखत अनुसूचीच्या सहाय्याने संकलित केलेल्या माहितीचे वर्गीकरण आणि विश्लेषण केले आहे. त्यावरून उत्तरदात्या स्त्रियांच्या व्यावसायिक भूमिकांचा त्यांच्या जीवनामध्ये विविध बाबीवर कशापद्धतीने परिणाम झाला आहे हे स्पष्ट होते.